# **“नाही”त काय?**

पक्ष्यांना येईना पोहता मासे वाचले
कोल्हा कोठे बिळात ससे नाचले

वारुळात नाही गरूड साप हरखले
झाडावर नाही केसरी वानर हसले

मांजराला पंख नाही पक्षी उडाले
ज्योत नाही पणतीत पतंग तगले

माणसाला भक्ती नाही मायेचे फावले
भुलले ना जे मायेला ते देवाला भावले

- नारायण
०५/२०/२०